# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**
**(Govt. of Maharashtra Undertaking)**

जा.क्र. मप्राशिप / समग्र शिक्षा / तोरणमाळ निवासी शाळा / २०१८-१९ /२७३६ '26 OCT 2018

वाचा :- १) प्रकल्प मान्यता मंडळाच्या दि. ०९-०२-२०१७ व दि.१०/०५/२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. मप्राशिप/सशिअ/आंतरराष्ट्रीय शाळा/२०१७-१८/१७२५ दि.२९/०७/२०१७.

---

विषय :- तोरणमाळ येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या निवासी शाळा अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना.

## परिपत्रक

सन २०१७-१८ मध्ये भारत सरकारने नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील तोरणमाळ येथे निवासी शाळा सुरू करण्यास मंजूरी दिली आहे. याबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना उक्त संदर्भांकित पत्र क्र. मप्राशिप/सशिअ/आंतरराष्ट्रीय शाळा / २०१७-१८/१७२५ दि.२९/०७/२०१७ अन्वये आपणांस निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर सन २०१८-१९ मध्ये वाढीव ५०० शाळाबाह्य मुलांसाठी निवासी शाळाची सुविधा त्याच ठिकाणी मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे सन २०१८-१९ मध्ये एकूण ८०० शाळाबाह्य मुलांना याठिकाणी नियमित शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. त्याअनुषंगाने तोरणमाळ परिसरातील शाळाबाह्य मुलांना या शाळेत प्रवेश द्यावा. कोणत्याही परिस्थितीत या जागा रिक्त राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. निवासी शाळेबाबतच्या आर्थिक तरतुदीचा तपशील परिशिष्ट "अ" मध्ये जोडला आहे. त्यानुसार विहीत निकष व नियमांच्या मर्यादेत निधीचा विनियोग करण्यात यावा.

इतर सूचना संदर्भिय पत्रान्वये तसेच वेळोवेळी दिलेल्या आदेशान्वये सन २०१८-१९ करिता कार्यान्वित असतील. निवासी शाळेत जेवणाचा दर्जा व निवासाची व्यवस्था उत्तम असावी, मुलांची सुरक्षितता, आरोग्य याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी. या निवासी शाळेतील मुलांना आंतरराष्ट्रीय



सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया
Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

दर्जाचे शिक्षण देण्याच्या हेतूने ही योजना सुरू केली आहे. या शाळेतील मुले प्रामुख्याने शाळाबाह्य व कधीही शाळेत न गेलेली आहेत. त्यामुळे त्यांना उत्कृष्ट गुणवत्तेचे शिक्षण देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची आहे. त्यासाठी जिल्हा शैक्षणिक् सातत्यपूर्ण व व्यावसायिक विकास संस्थेमार्फत मुलांचा अध्ययन स्तर निश्चिती करावा. प्रत्येक मुलास त्याच्या वयानुरूप अपेक्षित अध्ययन फलनिष्पत्ती साध्य होण्याच्या दृष्टीने शैक्षणिक कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी. त्यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य, साधने, शिक्षकांना प्रशिक्षण, इत्यादीकरिता तरतूद अंदाजपत्रकात मंजूर आहे.

सर्व खर्च नियमानुसार करण्यात यावा. केलेलया खर्चाचे व प्रक्रियेचे अभिलेखे जतन करुन ठेवावे व आवश्यकतेनुसार तपासणी / लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दयावे.

या निवासी शाळेमधील शैक्षणिक बाबींशी संबंधित यशोगाथा त्यामध्ये केसस्टडीज्, व्हिडीओज्, Testimonials, इत्यादी उल्लेखनीय बाबींचे मराठी व इंग्रजीमध्ये दस्ताऐवजीकरण (Documentation) करुन या कार्यालयास सादर करावे. जेणेकरुन ते भारत सरकारच्या Shagun पोर्टलवर अपलोड करण्यासाठी सादर करण्यात येईल.

**(विशाल सोळंकी,** भा.प्र.से.)
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प.,मुंबई तथा**
**आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रति,**

1) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय नंदुरबार.
2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार.

**प्रत माहितीस्तव,**

1) मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
2) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,**

1) आयुक्त (शिक्षण), आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
2) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
3) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
4) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
5) विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक.
6) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जिल्हा परिषद, नंदुरबार.
7) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, नंदुरबार.

परिशिष्ट "अ"

| Sr. No. | Description | Estimated Outlay | | |
|---|---|---|---|---|
| | | Unit cost (Rs. In Lakh) | Phy | Fin (Rs. In Lakh) |
| **Residential School for specific category of children** | | | | |
| **(A) 100 Children** | | | | |
| **Non-recurring (one time grant)** | | | | |
| 1 | Furniture / Equipment (including kitchen) | 3.00 | 5 | 15.00 |
| 2 | TLM and equipment including library books | 3.50 | 5 | 17.50 |
| 3 | Bedding (new) | 0.75 | 5 | 3.75 |
| **Sub Total (Non Recurring)** | | | | **36.25** |
| | **Recurring** | | | |
| 4 | Maintenance | 0.18 | 800 | 144.00 |
| 5 | Stipend per child | 0.018 | 800 | 14.40 |
| 6 | Supplementary TLM, Stationery and other educational material | 0.01 | 800 | 8.00 |
| 7 | **Honorarium** | | | |
| a) | 1 Warden | 3.00 | 2 | 6.00 |
| b) | 1 Full time Accountant | 1.80 | 1 | 1.80 |
| c) | 2 Support staff - (Accountant/Assistant, Peon, Chowkidar) | 1.08 | 4 | 4.32 |
| d) | 1 Head Cook | 1.20 | 3 | 3.60 |
| e) | 2 Asstt. Cooks | 1.08 | 6 | 6.48 |
| 8 | Specific Skill training | 0.01 | 800 | 8.00 |
| 9 | Electricity / water charges | 0.01 | 800 | 8.00 |
| 10 | Medical care/contingencies | 0.01 | 800 | 8.00 |
| 11 | Maintenance | 0.01 | 800 | 8.00 |
| 12 | Miscellaneous | 0.01 | 800 | 8.00 |
| 13 | Preparatory camps | 0.07 | 8 | 0.56 |
| 14 | P.T.A. / school functions | 0.003 | 800 | 2.40 |
| 15 | Capacity Building | 0.10 | 8 | 0.80 |
| 16 | Physical / Self Defence Training | 0.10 | 8 | 0.80 |
| **Sub Total (Recurring)** | | | | **233.16** |
| **Total (Non Recurring + Recurring)** | | | | **269.41** |